ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
UGC Approved

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

VOLUME - I ISSUE-XXI Jan-Mar.2018



TRIBUTE TO
STEPHEN HAWKING

ARTS | COMMERCE | SCIENCE
LIBRARY SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & I.T. | LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM

Power of Knowledge, An International Multilingual Quarterly Refereed Research Journal
UGC Approved
Sr.No.45681

Editor
Dr.Sadashiv H.Sarkate

E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

Power of Knowledge UGC Approved Journal Volume : I Issue XXI Jan to Mar 2018 ISSN 2320-4494


| | | | |
|---|---|---|---|
| १६ | निवडक मराठी चित्रपटाचे स्वरुप | प्रा.ढास रवींद्र बाबासाहेब | ६५ |
| १७ | दलित अल्पसंख्यांकाच्या आत्मकथनांचे स्वरुप | प्रा. डॉ.युवराज धबडगे | ६८ |
| १८ | बदलत्या काळानुसार मराठी भाषेतील स्थित्यंतरे | प्रा.डॉ.पंढरी डोईफोडे | ७१ |
| १९ | दलित साहित्य : सामाजिक प्रश्नांचा वेध | अविनाश सुदाम भालेराव | ७४ |
| २० | नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरीवरील जागतिकीकरणाचा परिणाम | प्रा. गोपाल ढोले | ७७ |
| २१ | मराठी दलित नाट्य चळवळ | अविनाश सुदाम भालेराव | ८१ |
| २२ | मराठवाड्यातील दुष्काळ आणि समकालीन ग्रामीण कथा | प्रा.डॉ.सोपान माणिकराव सुरवसे<br>गोविंद दासा गरड | ८३ |
| २३ | संत तुकारामांच्या अभंगातील लोकतत्त्व | डॉ.बी.आर. दहिफळे | ८६ |
| २४ | सामाजिक प्रतिष्ठा व लग्न सोहळ्यातील अवाढव्य खर्च | डॉ. विठ्ठल शंकरराव देशमुख | ८९ |
| २५ | स्त्रीवादी कविता | प्रा. डॉ. संगीता ग. घुगे<br>सौ. सविता सिदगौडा (बिरगे) | ९१ |
| २६ | आदिवासी साहित्याची वाटचाल | प्रा.डॉ.हनुमंत भवारी | ९५ * |
| २७ | प्रयोजनमूलक हिंदी और अनुवाद का महत्व | प्रा. डॉ. ज्ञानेश्वर भीमराव महाजन | १०१ |
| २८ | मध्यकालीन भक्तिसाहित्य और सामाजिक एकात्मता में प्रासंगिकता | प्रा. पाटील एस.डी. | १०३ |
| २९ | हिंदी उपन्यासों में चित्रित नारी का मनोवैज्ञानिक विश्लेषण | प्रा.डॉ.उत्तम जाधव | १०७ |
| ३० | २१ वीं सदी के प्रथम दशक की हिंदी स्त्री कविता | डॉ. सन्मुख नागनाथ मुच्छटे | ११० |
| ३१ | वैश्विक परिप्रेक्ष्य में हिंदी का स्थान | प्रा. डॉ. डी. बी. महाजन | ११३ |
| ३२ | भूमंडलीकरण के परिवेश में स्त्री एवं दहेज प्रथा | डॉ. ज्ञानेश्वर अंकुशराव देशमुख | ११६ |
| ३३ | शहरीकरणासाठी आर्थिक व पायाभूत सुविधा व वाहतुक व्यवस्था | प्रा. डॉ. प्रमोद कृष्णराव ढोकणे | ११८ |
| ३४ | नवजात बालकाची परंपरागत काळजी घेणे या संदर्भात नांदेड जिल्ह्यातील विविध समुदायांचा समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. यशवंत एस. चव्हाण<br>प्रा. भिमराव डी. पुंडगे<br>डॉ. सौ. एस.वाय.चव्हाण<br>डॉ. सुयश वाय. चव्हाण | १२३ |
| ३५ | क्रांतीकारक कान्हया भिल्ल | प्रा.मोहन जगन्नाथ काळकुटे | १२७ |
| ३६ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक सुधारणेतील योगदान | प्रा.डॉ.शिवाजी लक्ष्मण नागरगोजे | १३० |
| ३७ | छ. शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकराना केलेले सहकार्य | प्रा. डॉ .विद्यासागर पुंडलीक सोनकांबळे | १३२ |
| ३८ | आपत्ती व्यवस्थापनात प्रशासनाची भूमिका | प्रा.डॉ.बोबडे बी.बी. | १३६ |
| ३९ | शहरीकरण आणि घनकचरा व्यवस्थापन | प्रा.डॉ.राम तांटे<br>प्रा.अर्चना वाघमारे | १४२ |


SHRI ... MANI JAIN ... Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

# आदिवासी साहित्याची वाटचाल

**प्रा.डॉ.हनुमंत भवारी**

श्री पद्ममणी जैन महाविद्यालय पाबळ ता.शिरुर जि.पुण

प्रस्तावना :-

आदिवासी साहित्याचा विचार करण्यापूर्वी आदिवासी समाज समजून घेणे महत्वाचे आहे. आदिवासी समाज हा सर्वात दुर्लक्षित समाज आहे. आता कोठेतरी तो प्रकाशात येण्याचा प्रयत्न करत आहे. आता त्यांच्यामध्ये शिक्षणाची गोडी, आवड निर्माण होऊ लागली आहे. अर्थात त्यांना संधी मिळू लागली आहे. हे प्रमाण तसे अत्यंत नगण्य जरी असले, तरी सुरुवात झाली आहे. ही बाब महत्वाची आहे. मुळात आदिवासी ही संकल्पनाच व्यापक आहे. मूळनिवासी, आद्यमानव म्हणून आदिवासीचा उल्लेख होतो. त्याची संस्कृती तर जगात महान आहे. शिक्षणामुळे तो आपल्या भावना, वेदना आपल्या जीवनातील सत्य घटना साहित्यात मांडत आहे. आज पर्यंत त्याचे अनुभव दुसरे कोणीतरी लिहित होते. आज मात्र त्याच्या च मनातून, भावनेतून आलेले अनुभव तो स्वतः स्वतःच्या हातात लेखणी घेवून, कागदावर उतरविताना दिसतो आहे. ही सुरुवात आहे. येथुन पुढे निश्चित आदिवासी साहित्याला चांगले दिवस आल्याशिवाय राहणार नाही.

हा साहित्य प्रवाह प्रस्तापित साहित्यापेक्षा वेगळा आहे. त्यात कोणाचेही अनुकरण नाही. आता त्याचे साहित्य दालनही तितकेच समृध्द होताना आपल्याला दिसत आहे. कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललित साहित्य अशा प्रकारामध्ये तो लेखन करतातना दिसतो. आदिवासी साहित्य संमेलने, चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा, मेळावे यांच्यामुळे आदिवासी साहित्य समृध्द होताना दिसते. आदिवासी साहित्याचा विचार करत असताना आदिमता म्हणजे काय हे समजून घ्यायला हवे. आदिमता म्हणजे, मानवी जीवनाची प्राचीन अवस्था होय. आणि निसर्गाश्रयी प्राचीन आदिमतेच्या सर्व जाणिवांसह प्रकटणारे साहित्य हे आदिवासी साहित्य म्हणून ओळखता येईल.

आदिवासी साहित्य म्हणजे काय ?

आदिवासी जमातीमध्ये अनेक साहित्यीकांनी आता नव्याने लेखनास सुरुवात केली आहे. त्य ांना आलेले अनुभव, भोगलेले दुःख, त्यांच्यावर होणारा अन्यय, या गोष्टी त्यांनी साहित्यातून मांडल्या आहेत. ह्या अनुभवांना शब्दरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच बरोबर काही बिगर आदिवासी, संवेदनशील साहित्यकीकांना, आदिवासींच्या जगण्याबद्दल सहानुभूती वाटते, ज्यांना आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव आहे. अशातही काही साहित्यीकांनी आदिवासींच्या जीवनावर साहित्यनिर्मिती केलेली दिसते.

डॉ.विनायक तुमराम म्हणतात की, "आदिवासी साहित्य हे वनसंस्कृतीचे नातलग साहित्य होय. आदिवासी साहित्य हे रानावनातील वंचितांचे साहित्य आहे. ज्यांच्या प्रश्नांना भूतकाळाने कधी उत्तरेच दिली नाहीत, अशा दुर्लक्षितांचे साहित्य आहे. ज्यांच्या आक्रोशाला इथल्या सावत्र समाजव्यवस्थेने कधी न्यायच दिला नाही, अशा गिरीकुहरातील अन्यायग्रस्तांचे ते क्रांतीसाहित्य होय. येथल्या क्रुर कठोर न्यायव्यवस्थेने ज्यांच्या शेकडो पिढयांना आजीवन वनवास ठोठावला त्या आदिवासी समूहांचे ते मुक्तिसाहित्य होय." आदिवासींचे घायाळ आयुष्य ज्या संस्कृतीच्या कुसाआड राहिले, त्या संस्कृतीच्या प्राचीन इतिहासाला कुळारंभ देणारे हे साहित्य आहे. आदिवासी साहित्य हे या भुमीने प्रसविलेल्या आदिम वेदनेचे जाणिवेचे शब्दरुप होय."

"आदिवासी साहित्य म्हणजे प्रामुख्याने गोंड, राजगोंड, परधान, माडिया, कोलाम, महादेव कोळी, भिल्ल, कोरकू, वारली, आंध, पारधी, थोटी, बरडा, गामीत, धनवार, पावरा, वसवे, ओरॉव, अशा विविध जमातींचा समावेश आहे.



SHRI PADMAMANI J... Pabal Tal.Shirur Dist.Pune

आदिवासी म्हणविणाऱ्या या जमातीची गुणवैशिष्टये अभ्यासनीय आहेत. यांच्या जीवनावर जे साहित्य आहे. यास आम्ही आदिवासी साहित्य म्हणतो."

आदिवासी जीवन वास्तव समजून घेऊन, त्यांच्या जीवन जाणिवांचा अभ्यास करुन निर्माण झालेले हे साहित्य आहे. आदिवासी जीवनाला न्याय देणारे साहित्यचं खऱ्या अर्थाने आदिवासी साहित्य म्हणता येईल. मग तो लिहिणारा कोणीही असो. जन्माने आदिवासी असणाऱ्या साहित्यीकांनी लिहिले असले तरी त्याच्या साहित्यात आदिवासी जीवनाची नाळ आहे का ? त्याचे जीवनमूल्य आहेत का ? हे तपासले पाहिजे. तरच त्याचा आदिवासी साहित्य म्हणून उल्लेख करायला हवा.

आदिवासी जमाती अनेक देशांमधून विखुरलेल्या दिसतात. दरी-खोऱ्यामध्ये, राहणाऱ्या हया आदिवासी जमाती हळुहळु मुख्य प्रवाहांकडे वाटचाल करतांना दिसतात. शिक्षणाची जाणिव होऊन त्याचे महत्व त्यांना पटू लागले आहे. आता त्यांना संधी उपलब्ध होत आहेत. त्यांच्या पर्यंत शिक्षण पोहचले, त्यांची प्रगती झाल्याचे दिसते. शिक्षणानंतर तो साहित्य लेखनाकडे वळलेला दिसतो. हळूहळू आदिवासी साहित्य निर्माण झालं, कविता, कथा, कादंबरी, नाटक हे साहित्य प्रकार हाताळले जाऊ लागले. साहित्यीक निर्माण होऊ लागले आणि त्या साहित्याची जागतिक पातळीवर दखल घेतली जाऊ लागली. त्यांच्या जीवनावर चित्रपट निघू लागले, आदिवासी जरी आर्थिक दृष्टया दुबळा असला तरी त्यांच्या सांस्कृतिक ठेवा ही त्याची खूप मोठी श्रीमंती आहे.

ऊलगुलानकार भुजंग मेश्राम आदिवासी साहित्य चळवळी बाबत 'विश्वात्मक बंधुभाव' प्रकट करताना म्हणतात, "आपल्या आदिवासी कवी लेखकांनी नाळ जोडायची असेल तर काळया/निग्रो साहित्याशी जोडली पाहिजे" आदिवासी साहित्य आणि आदिवासी साहित्य चळवळ याची व्याप्ती ही वैश्विक पातळीवरची आहे. जेथे-जेथे आदिवासी जमाती आहेत. तेथे-तेथे आदिवासी साहित्य निर्माण होत आहे आणि साहित्य चळवळही जोर धरु पाहत आहे. भुजंग मेश्रामांच्या म्हणण्यानुसार निग्रोच्या साहित्याशी नाळ जोडली आहे, यावरुन एकंदरीत आदिवासी साहित्य आणि आदिवासी चळवळीची व्याप्ती विशाल आहे हे लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

१९६० नंतर निर्माण झालेल्या प्रवाहापैकी आदिवासी साहित्य हा एक प्रवाह आज एका नव्या दमानं आपली वाटचाल करत आहे. त्याला या वळणावर येण्यासाठी अथक परिश्रम घ्यावे लागले आहेत. मुळात आदिवासी मुळात जंगल, दऱ्या खोऱ्यात राहत असल्यामुळे त्याच्या पुढे आदर्श असे फार नाहीत. तो ज्या जंगलात राहत होता. वनस्पती, वृक्षवेली यांच्या सान्निद्यात आपले जीवन व्यथित होता. नद्या, नाल्याच्या मध्ये डुंबत होता. हयाच सर्व गोष्टीच त्याच्या साहित्य निर्मितीचे मूळ प्रेरणास्त्रोत आहे. म्हणजेच निसर्ग हिच आदिवासी साहित्य निर्मितीची पहिली प्रेरणा म्हणावी लागेल.

आदिवासी साहिज्य निमितिच्या प्रेरणे संदर्भात आदिवासी संशोधिका कुसुम नारगोलकर व वसंत नारगोलकर म्हणतात, "आदिवासी हा मानव समुह निसर्गनिभंर आहे गिरीकुहारात त्याचे स्वत्व दिलखुलासपणे निर्माण होते त्याचे निसर्गप्रेम विलक्षण आहे. निसर्गनिष्ठा अधिकदृढ आहे. निसर्गाच्या सान्निद्यात त्याना अकृत्रिमपणा जाणतोय.

उदा. बामणाच्या जन्माला जाशील,
लिखून लिखून मरशी
चांभार होशील, त नाडया जोती करुन मरशी
मारवाडी होशील, तोलूतोलून मरशी,
पण वारल्याच्या जन्माला जाशी
त जंगलाचा राजा होशी,

यावरुन त्याचे निसर्गावरील प्रेम, स्वजातीबद्दलचा अभिमान दिसून येतो.



SHRI PADMAMANI JAIN ... Pabal Tal.Shirur Dist.Pune

आदिवासी प्रेरणे संदर्भात डॉ.ज्ञानेश्वर वाल्हेकर म्हणतात, "स्वातंत्र्ययपूर्व व स्वातंत्र्योतर काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकररांनी दलित कल्याणार्थ विविध वैचारिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, लढे देवुन दलिताची मानसिक कोंडी फोडुन दलित जनतेचा पहिला शाब्दिक हुंकार देऊन त्याची अस्मिता जागृत केली. त्या पाठोपाठ त्याची प्रेरणा घेऊन भारतीय राज्यघटनेच्या संरक्षक कवचाखाली आदिमतर व आदिवासी जमातीतील विविध संस्था, व्यक्ती, सुधारणावादी मंडळी या सर्वांच्या अथक प्रयत्नातून आदिवासी मुक्तीच्या चळवळ सुरु झाली. त्यातून चळवळीचे अपत्य म्हणून १९७८-७९ नंतर मराठी साहित्याचा प्रवाह निर्माण झाला."

भारतीय स्वातंत्र्य व लोकशाहीमुळे आदिवासी ना सुध्दा राज्यघटनेने काही हक्क व अधिकार दिले त्यातूनच आदिवासींने जागृत होऊन संवेदनशलीपणे साहित्य निर्मितीस धजला आहे.

नवशिक्षितांच्या नागरीकरणामुळे आदिम समाजाचा जीवनावर परिणाम होत असल्यामुळे त्याच्या जीवनसंघर्षांचे व प्रेरणांचे स्वरुप बदलणे स्वाभाविक आहे.

धर्म, संस्कृती, वीरपुरुष व त्यांचा मुक्तिसंग्राम याशिवाय आदिवासीची बोलीभाषा ही सुध्दा प्रेरणा होऊ शकते.

शेवटी आदिवासी साहित्याच्या प्रेरणे संदर्भात डॉ.विनायक तुमराम म्हणतात,"आदिवासी जीवन हे अनेक कलाकुसरीनी युक्त आहे. त्याच्या चित्रकला, संगीतकला, विणकामकला, नृत्यकला, गायनकला, इ. कला दाखवण्याजोग्या आहेत. त्याचे समृध्द असे लोकसाहित्य, लोककथा, लोकगीत, उखाणे, म्हणी यांनी ते ठासून भरलेले आहे. प्रत्येक आदिम जमातीचे स्वत:चे असे वैशिष्टपूर्ण व परंपराप्राप्त लोकसाहित्य आहे मौखिक परंपरेने लोकवाङ्मयाचा अमूल्य ठेवा या जमातीनी सांभाळून ठेवला आहे. त्यातून या वन्य जमातीच्या भाषीक वैशिष्टयांनी ही शोध घेता येतो. लोककथा, लोकगीत, उखाणे, म्हणी, वाक्यप्रचार, इ. मधून या वन्य जमातीना नेमके काय सुचवायचे आहे. कोणता सामाजिक व सांस्कृतिक आशय व्यक्त करावयाचा आहे. हे आदिवासी साहित्यीकांनी प्रथम समजून घेतले पाहिजे त्यामुळे त्यातील जाणिवा प्रेरणाचा शोध घेता येईल." वरील प्रेरणा आदिवासी साहित्याच्या बाबतीत सांगता येतील.

आदिवासी साहित्याचे वेगळेपण मांडतांना इतर प्रास्थापित समाज व्यवस्थेने निर्माण केलेल्या साहित्याची तुलना करणे गरजेचे आहे. आदिवासी साहित्यामधून त्यांची व्यथा, वेदना, आक्रोश, त्याचबरोबर जमीनदार, सावकार, भांडवलदार या श्रीमंत वर्गाकडुन होणार अन्याय, अत्याचार, तसेच त्यांची भूक, वेठबिगार, दारिद्र्य विषमता या सर्वांचे वास्तव चित्रण, या साहित्यातून व्यक्त होते. प्रस्थापित मराठी साहित्यासारखे ते सौंदर्य प्रेम, शृंगार, भडक व बटबटीत नाही. या साहित्यामध्येही प्रेम आहे, शृंगार आहे, सौंदर्य आहे परंतु या सौंदर्याची परिभाषाच वेगळी आहे. एक नैतिक अधिष्ठान या प्रेमाला प्राप्त झालेले आहे. आणि नैसर्गिक सौंदर्यांनी तर ते साहित्य असे खळाळून वाहत आहे.

डॉ.विनायक तुमराम, आदिवासी साहित्याच्या वेगळेपणा विषयी म्हणतात,"नवशिक्षित आदिमांची प्रज्ञा, प्रतिभा आदिम वेदनेशी नाते जोडण्यास धजावत आहे. पुराणमुल्यांना जाणीवपूर्वक नकार देणारी नवी पिढी आदिवासींमध्ये उदयाला येऊ लागली आहे. प्रखर वास्तवाचे भान राखणारी ही पिढी आहे. या पिढीच्या जीवन जाणीवा टोकदार विद्रोही आहेत."

तुमरामांचा नव्या साहित्यीक पिढीवर असणारा विश्वास व्यक्त होताना दिसतो. येणारी नवी पिढी प्रज्ञा, प्रतिभावान आहे. त्याच्या जाणीवांप्रखर आहेत. टोकदार शब्दशास्त्र घेऊन ही पिढी ज्वलंत वास्तव रेखाटतील, ही खात्री तुमरामांना वाटते आहे. त्याचबरोबर आदिवासी साहित्याच्या वेगळेपणावर भाष्य करतांना सुप्रसिध्द आदिवासी साहित्यीक, कवी वाहरु सोनवणे असे म्हणतात, "आदिवासींच्या दु:खाचे संदर्भ वेगळे आहेत. त्याची उत्तरे सुध्दा वेगळया पध्दतीने शोधावी लागतील वेगळा आशय घेऊन येणारे शब्द शोधावे लागतील. म्हणून आदिवासी साहित्याचा प्रवाह वेगळा ठरतो."

आदिवासी साहित्याला आजपर्यंत जरी नाकारले असेल, त्याचे संवेदनशील मन आतापर्यंत व्यक्त होण्याची संधी हिरावून घेतली असली तरी आज त्या धडधडत्या अंगाराची भाषा निराळी आहे, त्यांची राजकीय तरतुदीमुळे तो समाज



SHRI PADMAMANI J... Pabal Tal.Shirur Dist.Pune

संवेदनशील झाला आहे. त्याला स्वत्वाची जाणीव झाली आहे. स्वभान त्याला प्राप्त झाल्यामुळे एक नवी दृष्टी त्याला मिळाली आहे. त्यामुळे एकूणच आदिवासी साहित्याला नवे रुप मिळाले आहे.

प्रस्तापितांच्या साहित्यांमध्ये आदिवासी साहित्याने आपला वेगळा ठसा उमटविला आहे. त्याची एक स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. जागतिक पातळीवर देखील आदिवासी साहित्याची दखल घेतली जात आहे. हेच त्या साहित्यामध्ये असणाऱ्या वेगळेपणामुळेच.

सामाजिक चळवळी आणि साहित्यनिर्मिती हया एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हणालयला हरकत नाही. कारण समाजातील चळवळीतुन साहित्यीक प्रेरणा घेतात व त्यातून साहित्य निर्मिती होते. तर अनेकवेळा साहित्यातून प्रेरणा घेऊन चळवळी निर्माण होतात. त्यामुळे साहित्य आणि चळवळी हया हातात हात घालून चालतांना दिसतात. उदा.ठाणे जिल्हयातील तलासरी या भागात वारल्यांच्या बंडानंतर गोदावरी परुळेकर त्यांनी 'जेव्हा माणूस जागा होतो' हे पुस्तक लिहिले त्याचप्रमाणे साहित्य वाचून चळवळी उभ्या करणारी माणसे सुध्दा आदिवासी साहित्यामध्ये दिसतात.

स्वातंत्र्यापुर्वी मराठी साहित्यामध्ये बिगर आदिवासींनी आदिवासींच्या जीवनावर काही प्रमाणामध्ये साहित्य लेखन केलेले आपणास आढळते. परंतु त्यामध्ये फारशी स्पष्टता दिसत नाही. समकालीन मराठी साहित्य लेखनामध्ये धुसर का होईना आदिवासींचा उल्लेख आढळतो. परंतु आदिवासींचे वास्तव चित्रण भिषण, भयाण, दारिद्रय मात्र काही ठराविक साहित्यीक सोडता फारसे कोणी केलेले दिसत नाही. सहानुभुतीपुर्वक, भूतदयावादी, दृष्टिकोनातून लिहिलेल्या साहित्यातुन आदिवासीचे वास्तवचित्र स्पष्ट होत नाही. यातून संपूर्ण आदिम जमातीचा विविध स्तरावरील जीवनसंघर्ष विस्तृत व व्यापक स्वरुपात येत नाही. कलावादी सौंदर्यवादी दृष्टिकोनातुनच हे साहित्य निर्माण झाल्याचे दिसते. म्हणून आदिवासींचा खरा चेहरा तत्कालीन पांढरपेशी समाजव्यवस्थेला माहित होत नाही.

एकूण आदिवासी साहित्य चळवळ इतर साहित्य चळवळीच्या मानाने खूप मागे आहे. तिला सक्षम होण्यासाठी, एकजुटीने प्रयत्न करण्याची गरज आहे. आदिवासी साहित्य निर्माण होत आहे. साहित्यीकांची संख्याही वाढत आहे. काव्याने दालन तर समृध्द आहेच. परंतु सर्व स्तरावरही साहित्यीक, कवी, सामाजिक कार्यकर्त्यांची एकजुट होणे महत्वाचे आहे. गटा-गटाचे राजकारण करुन चळवळ विकसित होत नाही. त्यामुळे सर्व साहित्यीकांनी व सामाजिक क्षेत्रात काम करण्याच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येवुन काम करायचे ठरविले तर चळवळीला चांगले दिवस येण्यास वेळ लागणार नाही.

**आदिवासी साहित्याचा आढावा -**

आदिवासी समाजामधील साहित्यिक आता साहित्य निर्मिती करु लागले आहे. सुरुवातीपासुन आजपर्यंतचा आढावा घ्यायचा झाल्यास ४० ते ५० पेक्षाही जास्त कवी/लेखक आदिवासी साहित्याने मराठी साहितला दिले आहेत. हया मध्ये प्रामुख्याने ज्यांचा नामोल्लेख करता येईल. डॉ.गोविंद गारे, वाहरु सोनवणे, डॉ.विनायक तुमराम, भुजंग मेश्राम, माधव सरकुंडे, एल.के.मडावी, व्यंकटेश आत्राम, नेताजी राजगडकर, डॉ.तुकाराम रोंगटे, उत्तमराव धोंगडे, सुनिल कुमरे, तुकाराम धांडे, डॉ.संजय लोहकरे, रामचंद्र जंगले, चामुलाल राठवा, दशरथ मडावी, वसंतराव कन्नाके, शंकर बळी, प्रा.वामन शेळमाके, लक्ष्मणराव टोपले, डॉ.माहेश्वरी गावीत, बाबाराव मडावी, तसेच नगुबाई गावीत, उषाकिरण आत्राम, कुसूम आलाम, सौ.संघजा मेश्राम, डॉ.पुष्पा गावीत, रेखा डगळे, सीता भोजने त्याचबरोबर आजच्या नव्या पिढीलतील ही काही कवी लेखन आपल्या परीने भर टाकत आहेत. चिंतामण धिंदळे, मनोहर मोहरे, कृष्णा भवारी, अशोक पेकारी, संतोष कॅगले, अशोक साबळे, हनुमंत भवारी, सारिका ब्रम्हांडे, अशा नवीन लोकांनीही साहित्याची कास धरुन आदिवासी साहित्य समृध्द करण्याचा प्रयत्न केला आहे.

अशा प्रकारे आपल्याला आदिवासींच्या जीवनावर व स्वतः आदिवासी लेखकांनी लिहिलेली ग्रंथ संपदा विपूल आहे. आजवरचा हा ग्रंथाचा खजिना आदिवासीच्या लोकसाहित्यबरोबर लिखित साहित्य सुध्दा समृध्द होत आहे हे दाखवितो.



SHRI PADMAMANI ... Pabal Tal.Shirur Dist.Pune

आता पर्यंत हे असंख्य ग्रंथ आदिवासींच्या नावावर आहेत. त्यात अजुनही भर पडेल आणि आदिवासींचे साहित्यविश्व, साहित्य चळवळीला चांगले उभारीचे दिवस येतील अशी अशा धरायला काही हरकत नाही.

आदिवासी साहित्य लेखनामध्ये विविध विषय मांडले आहेत. आदिवासी साहित्यामधून त्यांची व्यथा वेदना आक्रोश, अन्याय, अत्याचार त्याचबरोबर जमीनदार, सावकार, भांडवलदार या श्रीमंत वर्गाकडुन होणारा छळ, तसेच त्यांची भूक, वेठबिगार, दारिद्रय, अंधश्रध्दा, विषमता आदिवासींचे अज्ञान, अस्मिता जागृती, आदिवासी संस्कृती, आदिवासी स्त्रियांचे भावविश्व या सर्वांचे वास्तव चित्रण, जल-जंगल-जमीन विषयक प्रेम, या साहित्यातुन व्यक्त होते. अशा प्रकारे आदिवासी साहित्य लेखनामध्ये विविध विषय मांडले आहेत.

आदिवासी साहित्य प्रवाह समृध्द करायचा असेल तर आदिवासी साहित्यीकाला अजूनही काही आव्हाने पेलावी लागतील. आता जागतिकरणाचे वारे वाहू लागले आहे. त्या जागतिकीकरणामध्ये हे साहित्य टिकून राहण्यासाठी जागतिकरणामुळे निर्माण झालेले प्रश्न साहित्यातुन मांडायला हवेत. त्यावरील उपाययोनेवर भाष्य करणारे साहित्य निर्माण व्हायला हवे. आदिवासींच्या जगण्यातील प्रश्न, त्यांची संस्कृती, त्यांच्या जीवनपध्दतीचे अस्सल रुप साहित्यातुन मांडले पाहिजे. आदिवासी बोलीभाषेतच साहित्य निर्माण झाले पाहिजे. आदिवासींच्या विविध बोली आहेत, त्यांचे जतन व संवर्धन होणे गरजेचे आहे. आदिवासी स्त्रियांचे साहित्य लेखनातील योगदान वाढविले पाहिजे. त्यासाठी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दयायला हवे. कविता ह्या साहित्यप्रकाराचे दालन बऱ्यापैकी समृध्द झाले आहे. त्या तुलनेत कथा, कादंबरी, नाटक या साहित्य प्रकारांच्या वाढीसाठी या साहित्यप्रकाराकडे विशेष लक्ष देऊन मुद्दामहून साहित्य निर्मिती केली पाहिजे. त्यासाठी लेखक, कविंना प्रोत्साहित केले पाहिजे. कथालेखन स्पर्धांचे आयोजन केले पाहिजे, त्यातुन नवीन लेखक उदयास येतील. खरतर आदिवासीचे अनुभीव वेगळे आहेत, त्यांची जीवन पध्दती वेगळे आहे. तरीही आदिवासी साहित्याला प्रस्तापित साहित्याचे मापदंड लावले जातात. आदिवासी साहित्यासाठी स्वतंत्र मूल्यमापनपध्दती विकसीत व्हायला पाहिजे. शासनाकडुन साहित्य निर्मितीला प्रोत्साहन म्हणून आदिवासी लेखकांना पुस्तक प्रकाशनासाठी काही अनुदान दिले पाहिजे तरच हया साहित्याला उज्वल भवितव्य प्राप्त होईल. आदिवासी संस्कृती खूप व्यापक आहे. आदिवासी जीवनविश्व फार विशाल आहे. अजूनही त्यामध्ये खुप सकस साहित्य निर्मितीला वाव आहे. आदिवासी साहित्यप्रवाह समृध्द करायचा असेल तर आदिवासी साहित्यिकाला ही आव्हाने पेलावी लागतील.

**आदिवासी साहित्याची वैशिष्टे :-**

प्रस्तापित साहित्याच्या वैशिष्टयाप्रमाणेच साठोत्तरी साहित्य प्रवाहाचीही काही वेगळी वैशिष्टे आहेत. कोणत्याही साहित्य प्रकाराची नक्कल न करता ती आपली स्वत:ची अशी वेगळी शैली घेऊन उभी आहेत. ती पांढरपेशी साहित्याप्रमाणे साचेबध्द नाहीत. डॉ ज्ञानेश्वर वाल्हेकर म्हणतात, "मध्यमवर्गीय पांढरपेशी, सदाशिव पेठेतील अनुभव विश्वातून सत्य-शिव-सुंदर, परात्मभाव-लालित्य, सौंदर्य, अस्तित्व, विपन्नता निरागसता, व्यक्तिवाद, आत्मप्रौढी, आत्मविष्कार या सर्व साठी साहित्यातील वैशिष्टयांपेक्षा आदिवासी साहित्यांची वैशिष्टे आदिम जीवनाशी नागरी, शहरी, आधुनिक जीवनापासुन शेकडो मैल अरण्यात राहणाऱ्या आदिवासी जमातींचे वास्तव जीवन रेखाटणारी वैशिष्टे जाणवतात."

१. आदिवासींच्या वेदनांचे, दुखांचे, चित्रण करणारे हे साहित्य आहे.
२. आदिवासींच्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात आवाज उठवणारे हे साहित्य आदिवासींच्या विस्थापितांच्या बाजूने उभे राहणारे आहे.
३. हजारो-लाखो वर्ष त्यांच्यावर अन्याय झाला, जे अबोल राहिले, त्याच्या वेदनेला वाचा फोडणारे हे साहित्य आहे.
४. आदिम अस्मितेच शब्दरुप अविष्कार म्हणजे आदिवासी साहित्य होय.
५. भारतीय राज्यघटनेमुळे तसेच लोकशाहीमुळे तरुणांना आत्मभान आले.



SHRI PADMAMANI J... Pabal Tal. Shirur Dist. Pune

६. आदिवासी साहित्य भारतीय वर्णव्यवस्था जातीव्यवस्था नाकारुन एक वैविक साहित्याचा विचार मांडते.

७. स्वातंत्र्य, समता, बंधुता या नव्या आधुनिक मूल्यांची मांडणी करणार हे साहित्य आहे.

८. मराठी साहित्यातील कलावाद, सौंदर्यवाद टाळून समाजभिमुख/समाजसन्मुख आदिवासी साहित्य आहे.

९. आदिवासी जीवनातील संघर्ष व त्यांची वाताहात मांडणारे हे साहित्य आहे.

१०. भारतीय समाजजीवन व्यवस्थेतील आत्यंतिक उपेक्षित जीवनस्तरातील सामाजिक दुर्दशा आदिवासी साहित्यात दिसते.

११. जाती-पातीला मुठमाती देण्याचा प्रयत्न हे साहित्य करत आहे.

१२. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात वर्षानुवर्ष पिळलया गेलेल्या व स्वातंत्र्योत्तर काळात जामीनदार, भांडवलदार, शेठ सावकार, बडेशेतकरी यांच्यापासून नडलेल्या, नागवलेल्या आदिमांचे प्रकट मनोगत म्हणजे आदिवासी साहित्य होय.

१३. आदिवासी ग्रामीण भाषा सर्वांनाच ज्ञान नसल्यामुळे काही साहित्यामध्ये संवाद बोली भाषेच व निवेदन प्रमाणभाषेत केल्याचे दिसून येते.

१४. व्यथा, वेदना, शोषण, नकार आणि विद्रोह या साहित्याची ठळक व खास लक्षणे आहेत.

१५. वनवासमुक्ती ही या साहित्याची मुख्य भूमिका आहे.

१६. भाषिक वेगळेपणा जाणवतो.

१७. अभिव्यक्त स्वरुप, प्रकटीकरणाचे स्वरुप वेगळे आहे.

संदर्भ :-

१. तुमराम विनायक, आदिवासी साहित्य, दिशा आणि दर्शन, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, पआ.२०१२, पृ.१

२. वाल्हेकर ज्ञानेश्वर, आदिवासी साहित्य : एक अभ्यास, स्वरुप प्रकाशन औरंगाबाद-०३, प्रआ २००९ पृ.१२

३. मेश्राम भुजंग, अध्यक्षीय भाषण, ६ वे आदिवासी साहित्य संमेलन, यवतमाळ, पुस्तीका प. १२

४. वाल्हेकर ज्ञानेश्वर, आदिवासी साहित्य : एक अभ्यास, स्वरुप प्रकाशन औरंगाबाद-०३, प्रआ.२००९ प. १८

५. तत्रैव पृ.१६

६. तत्रैव पृ.१४

७. तत्रैव पृ.२४

८. तत्रैव पृ.२५

९. तत्रैव पृ.१४

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal, Tal.Shirur, Dist.Pune.
Shri Padmamani Jain
Arts & Commerce College
Pabal,Tal.Shirur,Dist.Pune.412403